# मराठा आरक्षणाचा ठराव आज मांडणार

» पान १ वरून
यासाठी सरकारने अत्यंत सविस्तर अभ्यास केला आहे. या अभ्यासाचा आधार घेत न्यायालयात दाखल केलेली याचिका निर्णयाप्रत पोचावी, यासाठी सरकारने अत्यंत काटेकोर नियोजन केले आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विधीज्ञ हरीश साळवे सरकारची भूमिका मांडणार आहेत. जिल्ह्याजिल्ह्यांत जाऊन समाजाचे प्रश्न काय आहेत, याचा शोध घेतला गेला आहे. मराठा समाजाबाबत अशी संवेदनशील भूमिका यापूर्वी कुणीही घेतली नव्हती हे विधिमंडळाच्या अधिवेशनात मांडले जाईल. मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार विधानसभेत सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावरील या चर्चेला प्रारंभ करतील. नगरपालिका निवडणुकांतील विजयानंतर फडणवीस सरकार आत्मविश्वासपूर्वक पावले टाकत आहे.

आर्थिक सवलत तसेच रोजगारनिर्मितीला देण्यात येणारी चालना हे मराठा समाजाच्या प्रश्नाची सोडवणूक करणारे मोठे निर्णय आहेत. ते आपण विधिमंडळात मांडले तर विरोधी पक्षाच्या हाती या विषयावर आंदोलन करण्यासारखे काही राहणार नाही, असे सत्ताधाऱ्यांना वाटते.

# उच्च न्यायालयात २५०० पानांचे प्रतिज्ञापत्र

» पान १ वरून
गोखले इन्स्टिट्यूटने तयार केलेले सर्वेक्षण अहवाल; ऊस तोडणी कामगारांचा अहवाल; शेतकरी आत्महत्यांचा अहवाल; हमाल-माथाडी कामगारांचा अहवाल; घरगुती कामगारांचा अहवाल प्रतिज्ञापत्रात देण्यात आला आहे. हे प्रतिज्ञापत्र सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षणमंत्री विनोद तावडे, सार्वजनिक बांधकाममंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष लक्ष घालून यात त्रुटी राहणार नाहीत, याची दक्षता घेतली आहे. न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी ७ डिसेंबर ही तारीख दिली असून, या तारखेला केवळ पुढील सुनावणीची तारीख निश्चित होणार असल्याचे सरकारी वकिलांनी सांगितले.

## अशी आहे वकिलांची टीम

मराठा आरक्षणासंदर्भात बाजू मांडण्यासाठी राज्य सरकारने वकिलांची मोठी 'टीम' न्यायालयात उतरवली आहे. यात सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील हरीश साळवे, मुंबई उच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील विजयसिंह थोरात, ज्येष्ठ वकील रवी कदम, मुख्य सरकारी वकील अभिनंदन वग्यानी, सर्वोच्च न्यायालयातील वकील श्रीराम पिंगळे यांचा समावेश आहे. मराठा आरक्षण विषयातील सरकारचे विशेष वकील, सरकारचे नोडल ऑफिसर, 'बार्टी'चे अधिकारी, निवडक कायदेविषयक तज्ज्ञ व संशोधकयांनी तब्बल दोन महिने सर्व पुरावे तपासून हे शपथपत्र तयार केले आहे.

सकाळ 06/12/16